# केंद्रीय योजना

## अ) दीनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय ग्रामीण जीवनोंन्नती अभियान (DAY-NRLM)

राज्यातील ग्रामीण भागातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यात आला. सदरील कार्यक्रमातंर्गत वैयक्तिक लाभार्थींवर भर देण्यात आलेला होता. सन 1999 मध्ये स्वर्ण जंयती ग्राम स्वरोजगार योजनेला सुरवात करून त्यामध्ये ग्रामस्तरावरील महिलांचे संघटन करून स्वयं सहाय्यता गटांची बांधणी व महिला सक्षमीकरण यावर भर देण्यात आला.

महाराष्ट्र राज्यात सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागातंर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या स्वतंत्र संस्थेची स्थापना संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये करण्यात आलेली आहे. सदरील अभियानाची अंमलबजावणी राज्यातील 34 जिल्हे व 351 तालूक्यात Intensive पद्धतीने करण्यात येत आहे. या ठिकाणी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालूका अभियान व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदरील अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र, सर्मपित व संवेदनशील मनुष्यबळ व अंमलबजावणी यंत्रणा प्रस्थापित करण्यात आलेली आहे.

ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमप्रवण कुटुंबांना समृध्द, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वावर आधारीत स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करून त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा, तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीन्े पोषक वातावरणाची निर्मिती करण्याचे काम महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत करण्यात येत आहे.

समुदाय संघटनाच्या माध्यमातून गावातील गरीब, गरजू व वंचित कुटुंबातील महिलांचे स्वयं सहाय्यता समुह तयार करून सदर समुहाचे गावनिहाय ग्रामसंघ तयार करण्यात येत आहेत. ग्रामसंघाच्या माध्यमातून विविध पथदर्शी प्रकल्प राबविणे, शासकीय योजनेचा लाभ मिळविणे, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांची भागिदारी वाढविणे, समुदाय संसाधन व्यक्तीची निवड करून त्यांची क्षमता बांधणी करणे, गावविकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये महिलांना समाविष्ट होण्यासाठी संधी उपलव्ध करुन्न देणे, महिला समूहांनी तयार केलेल्या विविध उत्पादनास वेगवेगळ्या पद्धतीने बाजारपेठ मिळवून देण्याचे तसेच उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्याचे काम अभियानामार्फत करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | निर्देशांक | एकूण प्रगती (अभियान सुरु झाल्या पासून) |
|---|---|---|
| **अ** | **अभियानाची व्याप्ती** | |
| १ | एकूण समाविष्ट जिल्हे | ३४ |
| २ | एकूण समाविष्ट तालुके | ३५१ |
| ३ | एकूण समाविष्ट ग्राम पंचायती | २६६३५ |
| ४ | एकूण समाविष्ट गावे | ३७०३२ |
| **ब** | **समाविष्ट कुटुंबे आणि संस्था बांधणी** | |
| १ | अभियाना अंतर्गत स्थापन झालेले एकूण स्वयं सहाय्यता समूह | ५८८७७९ |
| २ | अभियाना अंतर्गत समाविष्ट एकूण कुटुंबे | ५८९११३४ |
| ३ | एकूण ग्राम संघ | ३००९१ |
| ४ | एकूण प्रभाग संघ | १७३६ |
| **क** | **समुदाय निधी** | |
| १ | अभियाना अंतर्गत एकूण स्वयं सहाय्यता समूहाना दिलेला फिरता निधी | ३३२८८९ |
| २ | अभियाना अंतर्गत एकूण स्वयं सहाय्यता समूहाना दिली फिरता निधी ( रक्कम लाखात) | ४९४१६ |
| ३ | अभियाना अंतर्गत एकूण स्वयं सहाय्यता समूहाना दिलेला समुदाय गुंतवणूक निधी | ८६९९० |
| ४ | अभियाना अंतर्गत एकूण स्वयं सहाय्यता समूहाना दिलेली समुदाय गुंतवणूक निधी ( रक्कम लाखात) | ४८९१७ |
| ५ | अभियाना अंतर्गत एकूण ग्राम संघाना दिलेला जोखीम प्रवण निधी | ८२१० |
| ६ | अभियाना अंतर्गत एकूण ग्राम संघाना दिलेला जोखीम प्रवण निधी ( रक्कम लाखात) | ६४४१ |
| | **एकूण समुदाय निधी (लाखात)** | **१०४७७४** |

**ड) उपजीविका उपक्रम समावेशन**

| | | |
|---|---|---|
| १ | उपजीविका उपक्रम अंतर्गत समाविष्ट कुटुंबे | ३९३७८१६ |

**इ) आर्थिक समावेशन**

| | | |
|---|---|---|
| १ | बँक पतपुरवठा प्राप्त झालेल्या स्वयं सहायता समूहांची संख्या | ४३४२९३ |
| २ | बँक पतपुरवठा प्राप्त रक्कम (कोटी मध्ये) | १७३७१ |

## १. महिला किसान सशक्तीकरण परियोजना(MKSP)

महिला किसान सशक्तीकरण परियोजना (MKSP) ” हि दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामिण उपजिविका अभियान (DAY-NRLM) या योजनेचा उपघटक आहे. ‘ग्रामिण भागातील महिलांचा कृषी क्षेत्रातील सहभाग वाढविणे व त्यांना उपजीविकेच्या विविध संधी निर्माण करून देणे’ हे MKSP योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानामार्फत महिला किसान सशक्तीकरण परियोजना (MKSP) माहे जून 2016 पासून महाराष्ट्र राज्यामध्ये राबविली जात आहे.सदर योजना 20 जिल्ह्यांतील139 तालुक्यांमध्ये राबविली जात आहे. या योजनेंतर्गत बकरीपालन, कुक्कुटपालन, परसबाग, शेती अवजार बँक, मत्स्यशेती व व्यवस्थापन, रोपवाटिका व व्यवस्थापन – भाजीपाला,फळझाडे इ., पशुपालन व व्यवस्थापन, शेती व पशुपालन आधारित सूक्ष्म आणि लघु उद्योग निर्मितीस चालना देणे, उत्पादक गट तयार करणे (Informal) ,शेतकरी उत्पादक कंपनी तयार करणे इ. उपक्रमराबविले जात आहेत.

- **मार्च 2022 पर्यंतची प्रकल्पाची प्रगती :**

महिला किसान सशक्तीकरण परियोजना (MKSP) प्रकल्पांतर्गत माहे जून 2016 पासून मार्च 2022 पर्यत 7004 गावांमधील 60,574 महिला बचत गटांच्या माध्यमातून 4,34,357 कुटुंबांना शाश्वत शेती व शेती आधारित उपक्रमांचा लाभ देण्यात आलेला आहे.त्यातील 2,88,824 कुटुंब बकरीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यशेती इ. पशुधन विकास संबंधी उपक्रमांमध्ये समाविष्ट झाले आहेत. एकूण 648 उत्पादक गट (Informal) स्थापन करण्यात आले आहेत. या योजनेच्या माध्यमातून 02 महिला शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यात आल्या आहेत.

- **सद्यस्थितीत प्रकल्पाची प्रगती:**

महिला किसान सशक्तीकरण परियोजना (MKSP) प्रकल्पांतर्गत माहे एप्रिल 2022 पासून 25,350 कुटुंब शाश्वत शेती उपक्रमात सहभागी झाले आहेत. तसेच 9893 कुटुंब बकरीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यशेती इ. पशुधन विकास संबंधी उपक्रमांमध्ये समाविष्ट झाले आहेत. एकूण04उत्पादक गट (Informal) स्थापन करण्यात आले आहेत.

## 2. ग्रामीण उद्योजकता विकास कार्यक्रम (SVEP)

SVEP चे उद्दिष्ट ग्रामीण लघु-उद्योग सुरू करण्यासाठी सहाय्य देऊन आर्थिक विकासाला चालना देणे. त्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीबी आणि बेरोजगारी कमी करणे हा आहे . ग्रामीण उद्योजकांना अर्थ सहाय्यासाठी मुद्रा कर्ज प्राप्त करून देणे. स्वयंरोजगार सुरू केल्यानंतर सहा महिने उद्योजकांना सल्लागार तज्ञ पॅनेलद्वारे मार्गदर्शनाची व्यवस्था करणे. गाव पातळीवरील समुदाय केडर (CRP-EP) यांना प्रशिक्षण देऊन स्थानिक स्त्रोत विकसित करणे.

केंद्र सरकारकडून SVEP प्रकल्प राबविण्याची सुरवात राज्यात सोलापूर जिल्ह्यातील बार्शी व मोहोळ या दोन तालुक्यात 2016 या वर्षी झाली. सदर प्रकल्प राबविण्यासाठी स्वयं शिक्षण प्रयोग या संस्थेची केंद्र सरकारकडून निवड करण्यात आली होती. मार्च 2022 अखेरपर्यंत, बार्शी व मोहोळ या दोन तालुक्यात 4658 लघुउद्योगांची स्थापना करण्यात आली, यापैकी 1929 लघुउद्योगांना उमेदमार्फत 601 लक्ष CEF (Community Enterprise Fund) देण्यात आला, 337 लघु उद्योगांना 227.81 लक्ष मुद्रा कर्ज व 861 लघुउद्योगांना 568.17 लक्ष बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. तसेच 2970 लघुउद्योगांना उद्यम आधार प्राप्त करून देण्यात आले.

सद्यस्थितीत केंद्र सरकारकडून SVEP प्रकल्प राबविण्यासाठी 4 जिल्ह्यातील 6 नवीन तालुक्यांना शहापूर (ठाणे), पालघर (पालघर), जालना व भोकरदन (जालना), कळंभ व केळापूर (यवतमाळ) मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी जालना जिल्ह्यात स्वयं शिक्षण प्रयोग व इतर जिल्ह्यात Entrepreneurship Development Institute of India (EDII) या संस्थेची केंद्र सरकारकडून निवड करण्यात आली आहे. पुढील 4 वर्षात या जिल्ह्यांमध्ये 10200 लघुउद्योगांची स्थापना करणे प्रस्तावित आहे.

## 3. राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP)

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामस्तरावर ग्रामीण कुटुंबाच्या नवीन उपजीविका सुरु करणे व सध्याची उपजीविका बळकट करण्यासाठी अभियानातून स्वयं सहाय्यता समूह/ग्राम संघ/प्रभाग संघ यांचे मार्फत उपजीविका वृद्धीचे उपक्रम राबविले जात आहेत.यामध्ये कृषि व कृषि संलग्न उद्योगव्यवसायाची व्याप्ती वाढविण्यासाठी मूल्यवर्धन साखळीमध्ये महिलांचा सहभाग वाढवून उत्पन्नातवाढ करणे यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

प्रकल्पाची व्याप्ती15 जिल्हे 55 तालुके असून सदर प्रकल्प जागतिक बँक अर्थ सहाय्यित आहे. प्रकल्पाचा कालावधी तीन वर्षाचा आहे ( सन 2019- 2023). सदरची योजन केंद्र पुरस्कृत असून 60% केंद्र हिस्सा व 40% राज्य हिस्सा आहे.

- **NRETP अंतर्गत झालेली प्रगती :**

मार्च 22 पर्यत4325 उत्पादक गट तयार करण्यात आले असून यामध्ये80165 महिलांचा सामाविष्ट आहेत. तसेच विकास उपक्रमामध्ये 170 सेंद्रिय प्रभाग मध्ये 715 स्थनिक गट तयार करण्यात आले आहेत व 19 महिला शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या आर्थिक वर्षात 210 उत्पादक गट तयार करण्यात आले असून यामध्ये 3910 महिलां सामाविष्ट आहेत, 21 स्थनिक गट तयार केलेले आहेत. तसेच कृषिमूल्य साखळी आधारित 1 प्रोडयुसर ईन्टरप्राईज उद्योग विशेष प्रकल्प केंद्र शासनाने मंजूर केला असून यामध्ये वर्धा व यवतमाळ जिल्ह्याचा समावेश आहे सदर प्रकल्प 21.94 कोटीचा आहे. या जिल्ह्यातील एकूण 18049 महिला शेतकऱ्यांचा शेतमाल उत्पादन प्रक्रीये द्वारे थेट विक्री करून फायदा होणार आहे.

सन 22-23 या आर्थिक वर्षा मध्ये केंद्र शासनाने 100% अर्थसहाय्यित एकात्मिक शेती प्रभाग विकास प्रकल्पाला (Integrated Farming Cluster) मंजुरी दिली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील 8 जिल्ह्यातील 16 तालुक्यामध्ये 53 प्रभाक विकसित केले जाणार आहेत. प्रकल्पाच्या माध्यमातून 15900 महिलां लाभ होणार आहेत. जवळच्या 2-3 गावातील 300 कुटुंबे ज्यांच्याकडे 2-3 उपजीविका उपक्रमात समाविष्ट आहेत असा एक IFC प्रभाग तयार करणे व वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या उपक्रमांमध्ये सुधारणा, विस्तार व मूल्यसाखळी विकसित करणे असा प्रमुख उदेश आहे.

## 4. Formation and Promotion of १०,००० Farmer Producer Organization(१० k FPOs)

शेतीच्या शाश्वत विकासासाठी आणि कृषी समुदयांच्या सर्वांगीण सामाजिक,आर्थिक विकास आणि कल्याणासाठी (Ministryof Agriculture & Farmers Welfare) केंद्रशासन निर्देशाप्रमाणे सन 2020-21 पासून संपूर्ण देशामध्ये नवीन 10,000 FPOs निर्मिती करण्याचे उदिष्ट आहे.

- या प्रकल्पांतर्गत केंद्रशासनाकडून अभियानासाठी एकूण 25 महिला शेतकरी उत्पादक कंपनीचे उदिष्ट देण्यात आले आहे. अभियानंतर्गत एकूण 22 महिला शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी उदिष्टपूर्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्पअंमलबजावणीकरिता FDRVC या अंमलबजावणी संस्थेसोबत ऑगस्ट 2021-22 मध्ये करार करण्यात आलेला आहे. याअंतर्गत MSRLM Cluster Based Business Organization म्हणून काम करत आहे.
- 25 महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांना कार्यक्षम,किफायतशीर आणि शाश्वत संसाधानांच्या वापराद्वारे उत्पादकता वाढवणे, FPO चे व्यवस्थापन,निविष्टा,उत्पादन,प्रक्रिया,मूल्यवर्धन साखळी विकास,मार्केट लिंकेज ,क्रेडिट लिंकेजआणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी महिला शेतकऱ्यांमध्ये प्रभावी क्षमता निर्माण केली जात आहे.
- या सर्व बाबींमध्ये FPO निर्मितीच्या वर्षापासून पुढील 5 वर्षांपर्यंत नवीन FPO ना Handholding Support प्रदान करण्यात येणार आहे.
- सदर प्रकल्पांतर्गत 25 महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांना FPO Management Cost निधी प्रती FPO प्रती वर्ष सहा लाख याप्रमाणे FPO स्थापना वर्षापासून पुढील 3 वर्षपर्यंत प्रती FPO 18 लाख अनुज्ञेय आहे. अभियानाअंतर्गत एकूण 19 FPO Management Cost निधी मागणी प्रस्ताव FDRVC या अंमलबजावणी संस्थेकडे सादर करण्यात आले आहेत.
- प्रकल्पांतर्गत FPO च्या गरजेनुसार आणि वाढीनुसार Matching Equity सुविधेचा लाभ घेण्यासाठी सहाय्य करण्यात येत आहे Matching इक्विटी ग्रँट फंडसाठी शेतकरी जेवढे भाग भांडवल जमा करतील तेवढीच रक्कम शासनाकडून शेतकरी उत्पादक कंपनीला देण्यात येईल,निधी अनुज्ञेय जास्तीत जास्त 15 लाखापर्यंत आहे. सदर निधीसाठी अभियानंतर्गत 5 FPO चे प्रस्ताव प्राप्त आहेत.

## 5. एकात्मिक शेती प्रभाग विकास प्रकल्प (Integrated Farming Cluster (IFC) Project)

- NRETP प्रकल्पा अंतर्गत प्रकल्प प्रस्तावित
- 8 जिल्हे, 16 तालुके, 53 IFC प्रभाग मंजूर आहेत
- आर्थिक तरतूद- 16.96 कोटी रुपये मंजूर (100% केंद्र हिस्सा)
- प्रकल्प उद्धीष्ट- जवळच्या 2-3 गावातील 300 कुटुंबे ज्यांच्याकडे 2-3 उपजीविका उपक्रमात समाविष्ट आहेत असा एक IFC प्रभाग तयार करणे व वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या उपक्रमांमध्ये सुधारणा, विस्तार व मूल्यसाखळी विकसित करणे.
- प्रभाग स्तरावर उपक्रम सेवा वृद्धी व संसाधन केंद्र (Livelihoods Service Centre) ची स्थापना

LSC शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञान, प्रशिक्षण, निविष्ठा, कृषी यंत्रसामग्री, पशुवैद्यकीय सेवा, प्रक्रिया युनिट्स, स्टोरेज इत्यादींचा लाभ घेण्यासाठी सुविधा केंद्र (वन स्टॉप सोल्यूशन) म्हणून सहाय्य देईल.

**प्रकल्प सद्यस्थिती :**

- राज्य स्तरावरून प्रकल्प अंमलबजावणी व प्रकल्पअंतर्गत प्रस्तावित समुदाय संसाधन व्यक्तींची निवड मार्गदर्शिका जिल्ह्यांना देण्यात आले.
- IFC प्रभाग निहाय प्रत्येकी 300 महिला कुटुंबांचा baseline सर्वेक्षण करण्यात आले.
- प्रकल्पअंतर्गत प्रस्तावित समुदाय संसाधनव्यक्तींची निवड प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्पाचे प्रशिक्षण देण्यात आले.
- IFC प्रभाग निहाय सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्यात आला.
- 53 प्रभाग स्तरावर प्रत्येकी 1 उपक्रम सेवा वृद्धी व संसाधन केंद्र व 1 संकलन केंद्र स्थापन करण्यात आले.

## 6. सेंद्रिय शेती प्रभाग तयार करणे आणि त्यांचे "सहभाग हमी पद्धती, भारत सरकार" (PGS India) अंतर्गत प्रमाणीकरण करणे.

- **दीनदयाळ अंत्योदय योजना** – राष्ट्रीय ग्रामिण उपजिविका अभियान (DAY-NRLM) वराष्ट्रीय ग्रामिण आर्थिक परिवर्तन कार्यक्रम (NRETP) या योजनांतर्गत "सेंद्रियशेती" हा प्रकल्प उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामिणजीवनोन्नती अभियानामार्फत सन 2018-2019 पासून महाराष्ट्र राज्यातील 26 जिल्ह्यांमध्ये राबविला जात आहे. रसायनमुक्त/विषमुक्त शेतमाल उत्पादन हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या प्रकल्पामध्ये महिलांचे स्थानिक गट तयार करून त्या गटांचे सेंद्रिय प्रभाग तयार केले जातात. या सेंद्रिय प्रभागांमध्ये समाविष्ट महिला या PGSIndia च्या मानकांनुसार शेती पद्धतीचा अवलंब करून शेतमाल उत्पादित करतात. अशामहिलांची व त्यांचा शेतीसंबंधी बाबींची PGSIndia पोर्टलवर नोंद केली जाते आणि त्याद्वारे त्यांना सेंद्रिय प्रमाणपत्र प्राप्त होते. सदर काम तांत्रिक सहाय्य संस्था (TSA) व प्रादेशिक परिषद (RC) यांच्या सहाय्याने केले जाते.

**मार्च 2022 पर्यंतची प्रकल्पाची प्रगती:**

सेंद्रिय शेती प्रकल्पामध्ये माहे मार्च 2022 पर्यंत 26 जिल्ह्यांमधील 143 तालुक्यांतील महिला शेतकऱ्यांना समाविष्ट करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत309सेंद्रिय प्रभाग व1101स्थानिक गट स्थापन करण्यात आले आहेत ज्यामध्ये 15255 महिलांचा समावेश असून त्यांची एकूण12672 एकर जमीन सेंद्रिय शेतीखाली आणली गेली.सदर महिला भात, ज्वारी, सोयाबीन, कडधान्ये, भाजीपाला, काजू इ. पीके सेंद्रिय पद्धतीने घेत आहेत.1101 स्थानिक गटांपैकी 595 गट हे PGSIndia पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. 15255 महिलांपैकी 10226 महिला या PGSIndia पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. 10226 महिलांपैकी 6821 महिलांना विषमुक्त शेतमाल प्रमाणपत्र (PGSGreenCertificate) प्राप्त आहे. महिलांमार्फत 103 सेंद्रिय निविष्ठा उत्पादन व विक्री केंद्र स्थापन करण्यात आली.

- **सद्यस्थितीत प्रकल्पाची प्रगती:**

यवतमाळ व वर्धा जिल्ह्यामधील 2700 महिलांना सेंद्रिय शेतमाल प्रमाणपत्र (PGSGreenCertificate) प्राप्त झाले आहे.एकूण121 नवीन स्थानिक गटांची स्थापना करण्यात आली आहे. या गटांमधील 1110 महिलांना सेंद्रिय शेती व PGSIndia बाबतमुलभूत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## 7. ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) ब

- या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील 18 ते 45 वयोगटातील युवक, युवतींना स्वंरोजगारासाठी 10 ते 45 दिवसांचे कृषिविषयक प्रशिक्षण, प्रक्रिया उद्योग विषयक प्रशिक्षण, उत्पादन विषयक प्रशिक्षण व सामान्य उद्योजकता प्रशिक्षण असे विविध व्यवसायांचे (शेती व विचार शेती) मोफत व निवासी प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रा राज्यात एकूण 34 RSETI व एक RUDSETI आहे. 7 राष्ट्रीयकृत बँकांमार्फत सदर RSETI योजना राबविली जाते.
- सन 2021-22 करीता एकूण 18972 लाभार्थीना प्रशिक्षण देण्याचे उदिष्ट प्राप्त होते. पैकी 19606 लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे आणि एकूण 15232 स्वंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. स्वंरोजगार 3 पद्धतीने ग्राह् धरला जातो. Self-Finance, Bank Finance आणि Wage Employment

- सन 2022-23 करीता एकूण 27242 लाभार्थींना प्रशिक्षण देण्याचे उदिष्ट प्राप्त असून ऑगस्ट 2022 अखेर एकूण 8725 लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे व 990 लाभार्थींना स्वंरोजगाराच्या संधी देण्यात आलेल्या आहेत.

**ब) सांसद आदर्श ग्राम योजना (SAGY)**

- योजना दि. 11 ऑक्टोबर 2014 पासून सुरु करण्यात आली आहे. सक्षम आणि पारदर्शक पंचायती, ग्रामसंस्थांचा स्थानिक कारभारत सहभाग वाढवून लोकशाहीची मुळे घट्ट करणे आणि चांगली शासन व्यवस्था निर्माण करणे हे या योजनेचे महत्वाचे उदिष्ट आहे'. सांसद आदर्श ग्राम योजनेचा सन 2014-19 या कालावधीचा पहिला टप्पा दि 31 मार्च 2019 रोजी समाप्त झाला आहे. यानंतर दुसरा टप्पा सन 2019-24 सुरु आहे. मा.खासदार यांच्या माध्यमातून 2019 ते 2014 या कालावधीत दरवर्षी 1 प्रमाणे 5 गावांची निवड होणे आवशक आहे.

- सद्यस्थितीत सुरु असलेल्या केंद्र व राज्य पुरुस्कृत विविध योजनांच्या कृतीसंगामातून निधी उपलब्ध करावयाचा आहे. तसेच मा.खासदार निधी व CSR Fund इ. तून देखील निधी उपलब्ध करावयाचा आहे.

- मार्च 2022 पर्यंत एकूण 89 गावांची निवड झालेली होती. ऑगस्ट 2022 पर्यंत एकूण 109 गावांची निवड झालेली आहे.

**क) प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PM-FME)**

- केंद्र शासनाने आत्मनिर्भर भारत पँकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (Prime Minister Formalisation of Micro Food Processing Enterprises (PMFME) हि केंद्र पुरस्कृत योजना सन 2020 ते 2025 या पाच वर्षाच्या कालावधीसाठी सुरु केली आहे. सदर योजनेसाठी कृषी आयुक्तालय, पुणे हे राज्य नोडल एजन्सी (SNA) म्हणून काम पाहत आहे. PMFME योजनेंतर्गत वैयक्तिक व संघ स्वरूपातील सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांना सहाय्य करण्यात येत असून अन्नप्रक्रिया उद्योगांना भांडवलासाठी बँक कर्जाशी निगडीत पात्र प्रकल्प किमतीच्या 35% पर्यंत व जास्तीत जास्त र.रु 10 लक्ष या मर्यादेत प्रती प्रकल्पासाठी सबसिडी देण्यात येत आहे.

- उमेद अभियानाअंतर्गत स्थापित स्वयं सहाय्यता समूह सद्स्यामार्फत सुरु असलेल्या अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये वृद्धी करिता बीज भांडवल (Seed Capital) देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. योजनेंतर्गत एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) धोरणानुसार निवडलेल्या उत्पादनामध्ये काम करीत असलेल्या उद्योगांना प्राधान्य देण्यात येते. PMFME योजनेमार्फत अन्नपदार्थ प्रकिया उद्योगामधील स्वयं सहाय्यता समूहासाठी र.रु 40,000/- प्रती स्वयं सहाय्यता समूह सदस्य (कमाल 10 सदस्य व बीज भांडवल र.रु 4 लक्ष प्रती उद्योग) अश्या पद्धतीने बीज भांडवल देण्याची तरतूद आहे.

- बीज भांडवल घटकाअंतर्गत सन 2020-21 ते 2021-22 या कालावधीत 3556 अन्नप्रकिया उद्योगांमधील 7578 स्वयं सहाय्यता समूह सदस्यांना रक्कम रु 2682 लक्ष बीज भांडवल वितरीत करण्यात आलेले आहे. यापैकी 350 अन्नप्रक्रिया उद्योग ODOP आधारित असून त्यामधील एकूण 968 समूह सदस्यांना र.रु. 338.66 लक्ष बीज भांडवल घटकाअंतर्गत सहाय्य करण्यात आलेले आहे तसेच 35% क्रेडीट लिंक सबसिडी अंतर्गत 468 प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यात आलेले असून 96 अन्नप्रक्रिया उद्योगांना बँक कर्ज मंजूर झालेले आहे.
- PMFME योजनेंतर्गत बीज भांडवल घटकाअंतर्गत आर्थिक वर्ष 2022-23 साठीच्या वार्षिक कृती आराखडा अन्वये 6000 अन्नप्रक्रिया उद्योगामधील 12000 स्वयं सहाय्यता समूह सदस्यांना र.रु 3600.00 लक्ष बीज भांडवल स्वरुपात सहाय्य करण्याचे आर्थिक व भौतिक लक्षांक निश्चित करण्यात आलेले असून माहे ऑगस्ट अखेर 2909 सदस्यांमार्फत सुरु असलेल्या 1199 अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी र.रु 1019.63 लक्ष बीज भांडवलासाठी शिफारस कृषी विभागास अभियानामार्फत करण्यात आलेली आहे व 35% क्रेडीट लिंक सबसिडी अंतर्गत 398 प्रस्ताव सादर करण्यात आलेले असून 84 प्रकल्प प्रस्तावांना मंजुरी प्राप्त झालेली आहे. आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये सोलापूर व सिंधुदुर्ग जिल्हामध्ये ODOP आधारित सामुहिक पायाभूत सुविधा केंद्र (Common Infrastrure Facility) उभारण्याचे नियोजित असून त्याअनुषंगाने प्रकल्प प्रस्ताव तयार करण्याचे कामकाज सुरु आहे.

## **१. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)**

१. जागतिक बँक अर्थासहाय्यीत स्मार्ट प्रकल्प राज्यात सन 2019 पासून राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्य ग्रामीणजीवनोन्नती अभियानही एक स्वतंत्र प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा आहे.
२. लहान आणि सिमांत शेतकरी तसेच नव उदयोजकांना केंद्र स्थानी ठेवून शेतमालाच्या सर्व समावेशक आणि स्पर्धात्मक मूल्य साखळीचा विकास करणे हा प्रकल्पाचा मुख्य उदेश आहे.
३. प्रकल्पांतर्गत MSRLM मार्फत स्थापन तीन महिला शेतकरी उत्पादक कंपनी आणि एक प्रभाग संघ यांचे पथदर्शी उपप्रकल्प सन 2020 मध्ये मंजूर झाले असून त्यांची एकूण किंमत रुपये. 404.66 लक्ष आहे.
४. SMARTप्रकल्पा मार्फत मंजूर उप-प्रकल्पास 60% सबसीडी उप प्रकल्प अंमलबजावणीच्या टप्प्यानुसार देण्यात येते.
५. सदर 4 मंजूर पथदर्शी उपप्रकल्पास अद्याप पर्यंत रुपये. 101. 61 लक्ष अनुदान वितरित करण्यात आले आहे.

### **कॉल फॉर प्रपोसल–PP/MAP :**

- स्मार्ट प्रकल्पांतर्गत उमेद अभियानातील CLF यांच्यावर भर देण्यात येत आहे. यामध्ये प्रक्रिया उद्योग,गोदाम, प्रतवारी यंत्र, शितगृह आदी बाबींचा समावेश आहे. शेतमाल प्रक्रिया उद्योग करिता अधिकतम अनुदान मर्यादा रक्कम 2 कोटी आणि फलोत्पादन उद्योग करीता रुपये 3 कोटी अनुदान मर्यादा असून प्रकल्पातुन 60% आणि CBO चा स्वहिस्सा 40% आहे. या घटकांतर्गत 29 नवीन प्रस्तावना प्राथमिक मंजूरी मिळाली असून 4 प्रस्तावांना आर्थिक मंजूरी प्राप्त आहे.

### **ब्रीज टेक्निकल सपोर्ट :**

या घटकांतर्गत राज्यातील MSRLM अंतर्गत स्थापन ग्रामीण महिलांचे प्रभाग संघ तसेच मावीम अंतर्गत स्थापन लोक संचालित साधन केंद्र यांच्या 400 महिला शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याचे कार्य सुरू असून पुढील 2 वर्षात पूर्ण होईल. या करीता 2 सेवा पुरवठादार संस्थामार्फत राज्यात काम सुरू केले आहे.

### **व्यवसाय वृद्धी करीता प्रकल्पामार्फत सेवा पुरविणे :**

या घटकांतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील महिलांचे'एकूण 2000 उद्योग निर्मिती करण्यास प्रकल्पामार्फत तांत्रिक सहाय्य करण्यात येणार असून या बाबतचा TOR तयार करण्यात येवून जागतिक बँकेस सादर करण्यात आला आहे.

## **२. सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना :**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वंयसहाय्यता समूहांना प्रभावी 0% व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी दि. 14 ऑक्टोंबर 2016 पासून सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात आहे.

### **व्याज अनुदान वितरण करण्याची कार्यपद्धती :**

### **अ) प्रवर्ग 1**

राज्यातील गोंदिया, गडचिरोली, नंदुरबार, यवतमाळ, उस्मानाबाद, जालना, सोलापूर, रत्नागिरी, बीड, सिंधुदुर्ग, चंद्रपूर व वर्धा या जिल्ह्यांमधील महिला स्वंयसहाय्यता समूहांना बँकेमार्फत 7% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित परतफेड करणाऱ्या स्वंयसहाय्यता समूहांना केंद्रशासनाकडून 3% व्याज अनुदान प्राप्त होते. अशा स्वयंसहाय्यता समूहाला 4% व्याज अनुदान राज्यशासनाकडून सुमतीबाई सुकळीकर या योजनेंतर्गत देण्यात येते.

### **ब) प्रवर्ग 2**

प्रवर्ग 1 मधील जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यांकरिता महिला स्वंयसहाय्यता समूहांना बँकेमार्फत सर्वसाधारणतः 12.5% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित कर्जफेड करणाऱ्या महिला स्वंयसहाय्यता समूहाला NRLM अभियानांकडून 5.5% व्याज अनुदान देण्यात येते. अशा स्वयंसहाय्यता समूहाला 7% पर्यंत व्याज अनुदान राज्यशासनाकडून सुमतीबाई सुकळीकर या योजनेंतर्गत देण्यात येते. मार्च 2022 पर्यंत 1,46,120 स्वयंसहायता समूहांना 29.01 कोटी रकमेचे व्याज अनुदान अदा करण्यात आले आहे. सन 2022-23 करिता 53,639 स्वयंसहाय्यता समूहांना 6.70 कोटी रकमेचे व्याज अनुदान अदा करण्याची प्रक्रिया बँकेद्वारे चालू आहे.